# <u>गुढी पाडवा २००८ - महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क</u>

महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्क च्या २००८ सालच्या कार्यक्रमांचा शुभारंभ ३० मार्च रोजी गुढी पाडव्याच्या निमित्ताने झाला. स्टेजवर उभारलेल्या गुढीने मंगलमय वातावरण निर्माण केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंडळाला ऑडिओ ईक्विपमेंट देणगी दिल्याबद्दल स्वरांजली ग्रुपचे आभार मानण्यात आले. त्यानंतर, मंडळाच्या कामाला कित्येक वर्षे मोलाचा हातभार लावल्याबद्दल, डॉ. दिवाकर मुळगुंद यांना मानचिन्ह देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

गुढी पाडवा म्हणजेच वसंतऋतूची चाहूल, चैत्रातील उत्साहाची उधळण आणि आपल्या मनातील प्रसन्नता यांचा त्रिवेणी संगम. म्हणूनच ह्या शुभदिनी मंडळाने सादर केल्या तीन दर्जेदार एकांकिका - सुट्टीचा दिवस, गांधीहत्याः खून की वध आणि मनोमिलन.

उदयन आपटे दिग्दर्शित पिट्सबर्गच्या कलाकारांनी साकारलेल्या हलक्याफुलक्या सुट्टीच्या दिवसाने प्रेक्षकांना लगेचच जिंकून घेतले. भारत असो वा अमेरिका सुट्टीच्या दिवशी खरंच, निव्वळ आरामाऐवजी ढीगभर कामांचाच लोंढा गळयात पडतो ह्याची साक्ष प्रेक्षकांनी पोटभर हसत हसत दिली. या एकांकिकेनंतरच्या मध्यांतरात सर्वांना मंडळातर्फे दिलेल्या वाटलीडाळ व पन्हे यांचा आस्वाद घेता आला. स्त्रियांचा हळदीकुंकु समारंभही ह्याच वेळात पार पडला.

सुचेता साठे दिग्दर्शित न्यूजर्सीच्या कलाकारांनी सादर केलेल्या गांधीहत्येने प्रेक्षकांची मने हेलावली. स्वनिश्चयाच्या बळावर नथुराम गोडसेने केलेली गांधीहत्या हा अमानुष खून होता की देशप्रेम व तत्वनिष्ठेपायी त्याला करावा लागलेला गांधीवध होता हा पेच ह्या एकांकिकेने प्रेक्षकांसमोर प्रभावीपणे मांडला. अतिशय संवेदनक्षम अभिनयाने साकारलेला विशाल छेडा यांचा नथुराम प्रेक्षकांच्या मनाला चटका लावून गेला. या एकांकिके नंतरच्या मध्यांतरात मंडळातर्फे सर्वांना चहाकॉफीची सोय करण्यात आली होती.

डॉ. मनोज शहाणे निर्मित मनोमिलन ह्या एकांकिकेने गुढी पाडव्याच्या या रंगीत कार्यक्रमाचा अगदी गोडगोड शेवट केला. बी.एम.एम.ने 'टॅलेंट ट्रांस्फर' अंतर्गत उत्तर अमेरिकेत आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेत पहिले पारितोषिक मिळवलेली आणि उत्कृष्ट अभिनय (आशुतोष हडप) व उत्कृष्ट दिग्दर्शिका (विदुला मुणगेकर) ही बक्षिसे पटकवलेली ही एकांकिका थेट प्रेक्षकांच्या हृदयाला भिडली. प्रणयाराधन काळात प्रियकर प्रेयसीमधे खारटतिखट वादावादी झाल्यास दोन जीवांच्या मनोमिलनाला कशी अवीट गोडी येते हाच या एकांकिकेचा आशय होता. रांगडया, ठसकेबाज आबा पाटलांच्या भुमिकेत सुधीर कुलकर्णी यांचा अभिनय उल्लेखनीय होता. आशुतोष हडप यांचा लाजरा, बावरलेला पण घराण्याच्या अस्मितेसाठी पेटून उठणारा अभय खूपच कौतुकास्पद होता. वाक्यावाक्याला प्रेक्षकांमधून हशा पिकवणारी ही एकांकिका सर्वांनाच मजेदार वळणावर घेऊन गेली. प्रेक्षक तोच आनंद मनात साठवून घरी परतले.

महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्कचा गुढी पाडव्याचा हा कार्यक्रम २५० लोकांच्या उपस्थितीत दणक्यात पार पडला. लोकांचा उत्साह असाच वर्षभर कायम राहून मंडळाच्या यापुढील प्रत्येक कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळत राहो हीच सदिच्छा.

अर्चना सिधये
Secretary, MMNY